दिनांक :    .१२.२०१९

**प्रति,**

**मा. मुख्यमंत्री,**

**गोवा राज्य**

**विषय : बेतूल येथील मांडावरील हिंदूंच्या पूर्वापार चालू असलेल्या परंपरांना छेद न देण्याविषयी...**

महोदय,

बेतूल येथील मांडावर हिंदु पूर्वापार वार्षिक सत्यनारायण पूजा, शिमगोत्सव, गोकुळाष्टमी, श्री गणेशमूर्ती विसर्जन, दिवजोत्सव आदी धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने आणि गुण्यागोविंदाने साजरे करत; मात्र गेल्या एका वर्षांपासून तेथील ख्रिस्ती समुदायाकडून हिंदूंना धार्मिक सण साजरा करण्यास आडकाठी आणून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. चर्च संस्थेच्या दबावामुळे प्रशासन आणि पोलीस यांनी हिंदूंना यंदा मांडावर साजरा होणारा 'दिवजोत्सव' साजरा करण्यास अनुमती नाकारली. यामुळे पूर्वापार मांडावर होत असलेला दिवजोत्सव हिंदूंना अन्यत्र साजरा करावा लागला.

**※ तरी या संदर्भात आम्ही लक्षात आणून देऊ इच्छितो की...**

१. बाराडी, बेतूल येथील मांडावर हिंदु पूर्वापार विविध धार्मिक कार्यक्रम करत; पण यंदाच्या वर्षी चर्च संस्था ही जागा स्वत:ची असल्याचे सांगत हिंदूंना या ठिकाणी कोणताही धार्मिक सण साजरा करण्यास मनाई केली.

२. दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ या दिवशी शासन आणि पोलीस यांनी 'मांड असलेली जागा चर्च संस्थेच्या नावावर असल्याने त्या ठिकाणी दिवजोत्सव साजरा करू नये', अशी सूचना स्थानिक हिंदूंना केली. यामुळे हिंदूंना १२ नोव्हेंबरला असलेला दिवजोत्सव हिंदूंना अन्यत्र साजरा करावा लागला.

३. पूर्वजांकडून चालत आलेल्या प्रथा आणि धार्मिक परंपरा यांना हिंदूंच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व असून त्यांना आडकाठी आणून हिंदूंच्या धार्मिक भावनांना ठेच पोचवण्याचे कार्य केले जात आहे.

४. गोमंतकात आजवर हिंदु आणि ख्रिस्ती बांधव सलोख्याने अन् गुण्यागोविंदाने रहात आहेत. कोणतेही धार्मिक कलह नसतांना अशा धार्मिक उत्सवांना विरोध केला गेल्यास गोव्यातील धार्मिक सलोखा बिघडण्यास वेळ लागणार नाही. हिंदूंनी आतापर्यंत ख्रिस्त्यांच्या प्रथा आणि परंपरा यांसाठी कोणालाही कोणत्याही प्रकारची बाधा आणलेली नाही.

५. हिंदूंना धार्मिक उत्सव साजरा करण्यास अनुमती नाकारून काही गोमंतकाचे हितशत्रू हेतूतः दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

तरी बेतूल येथील मांडावरील हिंदूंच्या पूर्वापार परंपरांना छेद देण्यात येऊ नये. हिंदूंच्या परंपरागत शिमगोत्सव, सत्यनारायण पूजा, गोकुळाष्टमी, श्री गणेशमूर्ती विसर्जन, दिवजोत्सव आदी धार्मिक कृतींसाठी पूर्वीप्रमाणे अनुमती देण्यात यावी. याचसमवेत शेकडो वर्षांपासून मांडावर हिंदु उत्सव साजरे करत आहेत, त्यामुळे गोमंतकात असलेली शांतता अबाधित राखण्यासाठी ही जागा हिंदूंच्या धार्मिक परंपरांसाठी देण्याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, अशी समस्त गोमंतकीयांची मागणी आहे.

**आपला विश्वासू,**

संपर्क क्र.